यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

अभ्यास केंद्र - शासकीय अध्यापक महाविदयाल,पनवेल

ता . पनवेल जि.रायगड

अभ्यास केंद्र संकेतांक - ३२१३A

प्रथम वर्ष बी.एड. तुकडी – २०२५-२७

# शैक्षणिक साहित्य प्रदर्शन अहवाल

**कार्यक्रमाचे नाव** : शैक्षणिक साहित्य प्रदर्शन
**आयोजक** : शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल
**दिनांक** : 18 जानेवारी 2026
**स्थळ** : शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

**प्रस्तावना:-**

शिक्षण अधिक प्रभावी, रंजक व विद्यार्थी-केंद्रित होण्यासाठी शैक्षणिक साहित्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भावी शिक्षकांमध्ये सर्जनशीलता, नवोपक्रमशीलता व अध्यापन कौशल्यांचा विकास व्हावा या उद्देशाने शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक 18/1/2026 रोजी शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

**उद्घाटन व उपस्थिती**

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयातील मान्यवर प्राचार्य डॉ. सौं. रमा भोसले मॅडम तसेच प्राध्यापक डॉ. कुसुम चौधरी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, प्रशिक्षणार्थी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**प्रदर्शनाची वैशिष्ट्ये :-**

प्रदर्शनामध्ये विविध विषयांशी संबंधित शैक्षणिक साहित्य मांडण्यात आले होते. त्यामध्ये – चार्ट, तक्ते, मॉडेल्स

टीएलएम (Teaching Learning Material)

गणित, विज्ञान, भाषा व सामाजिक शास्त्र विषयांसाठी उपयुक्त साहित्य

पुनर्वापरातून तयार केलेली कमी खर्चिक साधने

डिजिटल व उपक्रमाधारित अध्यापनासाठी सहाय्यक साधने

प्रत्येक साहित्याची संकल्पना, उपयोगिता व अध्यापनातील महत्त्व प्रशिक्षणार्थींनी प्रभावीपणे स्पष्ट केले.







**उद्दिष्टे-**

भावी शिक्षकांमध्ये अध्यापन साहित्य निर्मितीचे कौशल्य विकसित करणे

नावीन्यपूर्ण व सर्जनशील अध्यापन पद्धतींचा प्रसार करणे

विद्यार्थी-केंद्रित व कृतीशील शिक्षणाला चालना देणे

**निरीक्षणे व अभिप्राय**

प्रदर्शनास भेट देणाऱ्या मान्यवर व प्राध्यापकांनी साहित्याची गुणवत्ता, कल्पकता व उपयुक्तता याबाबत समाधान व्यक्त केले. प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी परस्पर संवादातून नवीन कल्पना आत्मसात केल्या.

**समारोप**

शैक्षणिक साहित्य प्रदर्शनामुळे प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या आत्मविश्वासात वाढ झाली तसेच अध्यापन अधिक प्रभावी कसे करता येईल याबाबत त्यांना दिशा मिळाली. हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

अहवाल सादर करणारे :
नाव : श्री. संतोष बबन मोहिते
शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल